राहील, तर देणगी म्हणून ताईने ते कपाट शाळेला द्यावं. त्यांचीच मुलगी असलेल्या ताईनेही आनंदाने होकार भरला. समाजासाठी काही करायचे असते याचे बाळकडू असे घरी मिळे.

त्यातच जोड मिळाली ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची. शाळेतलेच शिक्षक नवाथे मास्तर आणि आर. एस. कुलकर्णी आमची शाखा घ्यायचे. शाखेत खेळता-खेळता राष्ट्रप्रेमाचे धडे गिरविले. संघशाखेची जबरदस्त ओढनिर्माण झाली. संघ हा जीवनविचार कधी बनला ते कळलेच नाही.

लहान-सहान घटनांतून घडत होतो. आमच्या काळी सातवीत व्हफाची (व्हर्नाक्युलर फायनल) परीक्षा असे. बोर्डाच्या परीक्षे-सारखीच. आटपाडीतल्या मुलांना पंढरपूर केंद्र येई. दळणवळणाची साधने मर्यादित. त्यामुळे एखाद्या शिक्षकाच्या सोबतीने मुले परीक्षेचे 2-3 दिवस पंढरपूरला गाडगे महाराजांच्या धर्मशाळेत जाऊन राहात. मीही तसाच गेलो. पंढरपूरला गेल्यावर विठोबाचे दर्शन घेणे ओघानेच आले. स्वातंत्र्यपूर्व काळात वर्णभेद फार जाचक. पण गावाबाहेर शाळेत राहाणा-या माझ्यासारख्या सवर्ण मुलाला तो कसा जाणवावा? पहिला फटका बसला तो पंढरपूरला. माझ्या मित्रासोबत मी देवदर्शनाला जाऊ शकलो नाही. काही दोस्त मंडळींना देवदर्शनासाठी वेगळी रांग लावावी लागली हे पाहून माझ्या जीवाचा संताप झाला. त्यातच देवस्थानातील बडवे आणि बाहेरील भिकारी यांचा उच्छादही प्रथमच अनुभवला. मनात करुणा, तिटकारा, संताप घेऊनच घरी परतलो. अण्णांशी बोललो, शाखेत चर्चा झाली. माणसा-माणसात भेद नको हा धडा शिकलो. त्यानंतर काही वर्षांनी याच विठ्ठल मंदिरात सर्वांना प्रवेश मिळावा म्हणून साने गुरुजींचे गाजलेले उपोषण झाले.

त्या स्वप्नाळू वयात खूप काही करायचे होते. दुष्काळी गावात हुशारीचे कौतुक होते. आपणही डॉक्टर-इंजिनिअर होऊ असे त्यामुळे वाटे. पण वडिलांची आर्थिक स्थिती तशी नव्हती. दोन बहिणी आणि तीन भावांतला मी मधला. सर्वांनाच अभ्यासात गती. वडील शिक्षणाचे महत्त्व जाणत. पण शिक्षक वडिलांचे मोजके उत्पन्न. त्यात गावात सोय नाही तेव्हा महाविद्यालयीन शिक्षणासाठी मोठ्या शहरात जाऊन राहाण्याचा खर्च. अण्णांनी सांगितलं की तुला चार वर्षे शिकविणे मी जमवेन. तू त्यानुसार योग्य अभ्यासक्रम निवड. डॉक्टर व्हायचं स्वप्न ओठावरही येऊ न देता मी पुण्याच्या कॉमर्स कॉलेजात शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. चार वर्षात बी.कॉम्. होणं शक्य होतं. पुण्याच्या बृहन् महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (बीएमसीसी) मध्ये दाखल झालो खरा पण पहिले संपूर्ण वर्ष बुजण्यातच गेले. पुण्यातले विद्यार्थी रुबाबदार वाटत. आपल्या खेडवळ राहाणीचा संकोच वाटे. त्यात गावातल्या पहिल्या नंबराचा इथे काहीच रुबाब नाही हे लक्षात आले कारण वर्गात त्याही पुढे अनेक होतेच. भरीला वडिलांवर कमीतकमी भार पडावा म्हणून काटकसरीने राहाण्याची धडपड चाले. होस्टेल-वसतीगृह परवडत नाही म्हणून दर टर्मला नवी खोली शोधणे भाग व्हायचे. पण उरात जिद्द होती. त्याही परिस्थितीत कुठे शिकवणी मिळते का बघा, कधी वृत्तपत्रे विका असे करत छोटी कमाई करून अण्णांचा भार हलका करण्याचा प्रयत्न करायचो. अण्णांचे प्रत्येक आठवड्याला पत्र असे. मीही वेळेवर पत्र पाठवेन याकडे त्यांचा कटाक्ष असायचा. पत्रातून त्यांना मी हिशेब कळवायचा व ते त्यातही पैसे कसे वाचवता येतील हे सुचवित. वरकरणी रुक्ष पत्रात एखादीच ओळ असे. 'सेकंड हँड सायकल मिळते का बघ, मी कसेही करुन पैशांचे जमवेन, चिंता करु नये.' वडिलांची माणसांची कमाई इथेही कामी आली. ग. दि. माडगूळकरांनी पंचवटी बंगला विकत घेतल्यानंतर आऊटहाऊसमध्ये शेवटची दोन वर्षे माझी राहायची सोय करुन दिली. याच काळात राजा परांजपे, पु.भा. भावे, सुधीर फडके या मान्यवरांशी परिचय झाला. या मित्रमंडळींच्या राजकारणावर गप्पा सुरु झाल्या की फडके एकटे पडायचे कारण फक्त तेच संघवाले. मग गदिमाच सांगायचे आऊटहाऊसमधला रामही (फडक्यांचे खरे नाव राम) तुझ्याच जातीचा आहे. संघबंधू म्हणून बाबुजींच्या मनात वेगळी आस्था निर्माण झाली. ते नातं आयुष्यभर आम्ही जोपासलं.

आर्थिक चणचण सोडली तर महाविद्यालयीन शिक्षणाचे दिवस म्हणजे एक सुंदर स्वप्न वाटावं इतके छान गेले. माझ्या जीवनाचा पाया रचण्यासाठी जणू विधात्याने सदगुणी माणसांची सुगीच माझ्या आयुष्यात तेव्हा आणली. पुण्यात आल्यावर नवी संघ शाखा गाठणे ओघाने आलेच. वैदिकाश्रम शाखेचा स्वयंसेवक झालो. भागकार्यवाह म्हणून मार्गदर्शन लाभलं कै. रामभाऊ म्हाळगी यांचं. आयुष्यात काय योगायोग असतात! मिसरुड फुटत असताना ज्यांनी जीवनाला दिशा देण्यात सिंहाचा वाटा उचलला तेच कै. रामभाऊ पुढे आमदार-खासदार झाले. त्यांची ती कारकीर्दही एवढी प्रभावी ठरली की पुढे मी जेव्हा आमदार-खासदार झालो तेव्हा माझी वाखाणणी करणा-या प्रत्येकाने कै. म्हाळगींची परंपरा पुढे चालवित असल्याचे म्हटले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे शिल्पकार कै. यशवंतराव केळकर, माजी शिक्षक आमदार व शिक्षक संघटनेचे आधारस्तंभ श्री. मुकुंदराव कुलकर्णी, संघप्रचारक व एकता मासिकाचे संपादक कै. रामदास कळसकर, ज्ञानप्रबोधिनीचे श्री.यशवंत लेले, जलतज्ज्ञ डॉ. माधव चितळे ही भविष्यात नावाजलेली मंडळी संघ-कार्यात मित्र-मार्गदर्शक म्हणून लाभली. सारेच तेव्हा तरुण होतो. स्वप्ने बघत होतो. या सुसंगतीचा स्वाभाविक परिणाम माझ्या जडणघडणीवर झाला.

इंग्रजीत तर म्हणतातच "Man is known by the company he keeps". पूर्व जन्मीचे पुण्य म्हणा किंवा योगायोग म्हणा महाविद्यालयातही असे अनेक वर्गबंधू लाभले ज्यांनी पुढे भविष्यात आपापल्या क्षेत्रात खूप नाव कमावले. ज्या महाविद्यालयात मी शिकलो त्याच बीएमसीसीची प्रतिष्ठा वाढविण्याचे काम शिकत असताना माझ्याच बाकावर बसणारा माझा मित्र वैद्य करेल हे तेव्हा कुठे माहीत होते. हुशार वैद्यच्या नोट्स मी हक्काने वापरायचो. तो पी.टी.चा युनिफॉर्म बदलायला माझ्या खोलीवर यायचा, गप्पा रंगायच्या. तेव्हा कुठे माहीत होतं की हाच पुढे प्रदीर्घ काळ याच कॉलेजचा प्राचार्य होईल. डॉ. चिं. ग. वैद्य हे वाणिज्य ज्ञान क्षेत्रात मातब्बर नाव झालं याचा आम्हां सर्व वर्गबंधूंना अभिमान वाटतो. अलका टॉकीजचे वसंत